hastkala Life

WOVEN BY CULTURE

30 YEARS

हस्तकला लाईफच्या पुढील
पुरवणीच्या मजकुरासाठी
संपर्क : साक्षी - 93240 14616
ऐश्वर्या - 91580 61923

VOLUME: 01 | ISSUE : 08 | May 2025 | 12 PAGES

Managing Editor : Nikhil Ballal

Supported by ठाणेवैभव



Pravin CHHEDA

CHAIRMAN, HASTKALA

THIRTY HUES OF SUCCESS

Hastkala has become a household name for two major reasons. One, that it has a wide range of choices that our privileged customers need and trust us for the same and second reason being we have made all our loyal customers participate and remain engaged. The latter reason does not necessarily mean that we are more focussed on selling our merchandise but also emphasise on our patrons' overall well being. Be it arranging an event or sharing of knowledge like the one of making them aware of our great weaving tradition.

On the occasion of our 30th anniversary, we at Hastkala have decided to commemorate the moment by highlighting the achievements of 30 remarkable women who have earned a name and carved success in their own fields and vocations. For us they are idols, the torch bearers and living examples who can be emulated.

Hastkala believes that a woman has to be perceived in many roles which she plays effectively, which in turn makes her personality stand out. Afterall, beauty has many hues and the fabric is weaved by the threads of achievement. This anniversary number exactly brings to you the. Thirty achievers. Let's celebrate their success with ours!!

आंतरराष्ट्रीय स्तरावर मधुरीकाने ठाण्याचे नाव उंचावले

"प्रत्येक वेळेस जिंकणं महत्वाचं नसतं, पण प्रत्येक वेळेस चांगलं खेळणं महत्त्वाचं असतं," हे वाक्य जणू मधुरिका पाटकर यांच्या जीवनशैलीचं सार आहे. भारताच्या आघाडीच्या टेबल टेनिसपटूंमध्ये गणल्या जाणाऱ्या मधुरिका यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपलं नाव उंचावलं आहे. त्यांच्या प्रवासातली जिद्द, समर्पण आणि सातत्य ही आजच्या पिढीला प्रेरणा देणारी ठरते.



मधुरिका यांना टेबल टेनिसची ओळख लहानपणी त्यांच्या वडिलांमुळे झाली. वडिलांनी त्यांना क्लबमध्ये नेलं आणि खेळाची आवड तिथूनच सुरू झाली. सुरुवातीला फक्त मजेसाठी खेळ सुरू झाला, पण जसजशा स्पर्धा जिंकायला लागल्या, तसतशी ती आवड एक ध्यास बनली. त्यांचा पहिला मोठा सामना सिनिअर नॅशनल्समध्ये होता, जिथे सुरुवातीला भीती वाटली, पण कोर्टवर पाऊल ठेवताच त्या फक्त आपल्या खेळावर केंद्रित राहिल्या. तो सामना त्यांच्या क्षमतेची जाणीव करून देणारा ठरला.

I पान १० वर

श्रद्धा नाईक : बॉलीवूडच्या सौंदर्यविश्वामागची जादूगार



आजच्या झगमगत्या आणि आकर्षक बॉलिवूड विश्वात कलाकारांचे अभिनय कौशल्य जितके महत्त्वाचे असते, तितकेच त्यांच्या सौंदर्याला आणि लूकला उठाव देणाऱ्या मेकअप आर्टिस्ट्सचे योगदानही अमूल्य असते. अशीच मेहनती, हुशार, प्रतिभावान सुप्रसिद्ध आणि गुणी मेकअप आर्टिस्ट म्हणजे श्रद्धा नाईक. श्रद्धाने आपल्या मेहनतीने आणि कौशल्याने अनेक सेलिब्रिटींच्या सौंदर्याला नवे परिमाण दिले असून, ती आजच्या पिढीच्या प्रेरणास्त्रोतांपैकी एक ठरली आहे.

श्रद्धा एक सर्वसामान्य मराठी कुटुंबातील मुलगी असून तिला लहानपणापासून सौंदर्यसृष्टीची आवड होती.

I पान ११ वर



श्रद्धा नाईक

CA Pradhan handling CSR of Reliance Foundation

CA Sangeeta Pradhan's journey into Commerce was driven by a clear goal - to become a Chartered Accountant, even as the rest of her family pursued Science. Despite limited academic guidance at home, her family offered strong emotional support, which helped her excel in her career and today is handling CSR of India's leading foundation - Reliance Foundation.



CA Sangeeta Pradhan

Balancing work life balance was no easy task, but Sangeeta managed it with clarity, faith and strong prioritisation. Her message to aspiring women is simple yet powerful: "Self-belief is more important than any unknown suggestions."

I Page 11



नीलिमा कढे: चित्र, नृत्य आणि शिक्षणाचा मिलाप

चित्रकार, नृत्यांगना, प्राचार्य, लेक्चरर आणि संस्थापिका या विविध भूमिकांमधून आपली ओळख निर्माण करणाऱ्या नीलिमा कढे या ठाण्यातील एक निष्ठावंत आणि समर्पित कलाकार आहेत. कला हेच जीवन मानणाऱ्या नीलिमाताईंनी आपले आयुष्य चित्रकला, नृत्य आणि शिक्षण क्षेत्राला समर्पित केले आहे.

नीलिमाताईंची चित्रकलेची आवड शालेय जीवनातच निर्माण झाली. दातार सरांमुळे या कलाप्रकाराकडे त्यांचे लक्ष वेधले गेले. अभ्यासापेक्षा कलेमध्ये अधिक रस असल्यामुळे त्यांनी दहावीनंतर थेट सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये प्रवेश घेतला. तेथे पाच वर्षांचा डिप्लोमा पूर्ण केला. केवळ स्वतःला चित्रकार म्हणून घडवणे नव्हे, तर भविष्यात इतरांना कला शिकवता यावी या हेतूने त्यांनी डिप्लोमा इन आर्ट एज्युकेशनचे शिक्षणही घेतले. याच काळात त्यांनी विविध चित्रप्रदर्शनांत भाग घेण्यास सुरुवात केली.

ठाण्यासारख्या शहरात सर्वच शैक्षणिक शाखांची सुविधा असताना चित्रकलेसाठी उच्च शिक्षणाची सोय नव्हती. ही उणीव भरून काढण्यासाठी त्यांनी १९८४ मध्ये ठाणे आर्ट सोसायटीची स्थापना केली आणि त्या माध्यमातून ठाणे स्कूल ऑफ आर्ट्स या कला महाविद्यालयाची मुहूर्तमेढ रोवली. आज हे महाविद्यालय ५-६ विविध कोर्सेससह सुमारे २०० विद्यार्थ्यांना चित्रकलेचे शिक्षण देत आहे. नीलिमाताई स्वतः संस्थेच्या प्राचार्या म्हणून कार्यरत असून त्यांनी ठाण्यातील चित्रकलेच्या क्षेत्राला नवी दिशा दिली आहे.

चित्रकलेबरोबरच नृत्यकलेतही त्यांनी प्रावीण्य मिळवले आहे. दादर येथे सुप्रसिद्ध नृत्यांगना सुचिता भिडे- चापेकर यांच्याकडून भरतनाट्यमचे शिक्षण त्यांनी घेतले आणि पुणे विद्यापीठातून नृत्य विषयात एम.ए. पदवी मिळवली. नृत्य आणि चित्र या दोन्ही कलांमध्ये असलेला अंतःसंबंध हा त्यांचा अभ्यासाचा आणि मार्गदर्शनाचा गाभा आहे. स्लाईड शो, व्याख्याने, मासिकांमधून लेखन या स्वरूपात त्या सतत कार्यरत असतात. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रात त्या बी.ए. आणि एम.ए.च्या विद्यार्थ्यांना नृत्य विषयावर व्हिजिटिंग लेक्चरर म्हणून मार्गदर्शन करतात. याशिवाय त्यांनी अनेक वर्षे नृत्यवर्ग चालवले आणि विद्यार्थ्यांना घडवले. पेंटिंग्जचे कार्यही सातत्याने सुरू आहे.





नीलिमा कढे यांना केंद्र सरकारच्या ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट विभागाची ज्युनियर रिसर्च फेलोशिप मिळाली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत कायद्याने वागा चळवळीतर्फे त्यांना सावित्री पुरस्कार, We Need You Society कडून शिक्षणव्रती पुरस्कार तसेच सूर सिंगार तर्फे सिंगार मणी किताब देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. याशिवायही अनेक सन्मान त्यांना मिळाले आहेत.

नीलिमा कढे या केवळ एक कलाकार नाहीत, तर एक प्रेरणा आहेत ज्या कलेच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात, ही साक्ष त्या आपल्या कार्यातून सातत्याने देत आहेत. त्यांच्या कलेतील निष्ठा, शिक्षणातील समर्पण आणि सतत नवनवीन प्रयोगांमधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेपण अधोरेखित होते.

Offering selfless service has been the hallmark of Dr Sandhya Bhat

Daughter of Rotary legend Dr R. M. Bhat, Dr Sandhya Bhat has lived up to her legacy with distinction. An anesthesiologist from Lokmanya Tilak Municipal Hospital, Sion, she served as a lecturer at her alma mater before rising to prominence during the 2003 Mumbai terrorist attack. Her heroic role in a 20-hour operation saved a critically injured victim, who, in a twist of fate, became her neighbour three years later.

Her excellence has been widely recognised—she received the Hall of Fame Award from Ganga Hospital, the President's Appreciation Award from Maharashtra (2018), "Doctor of the Year" honour from the Indian Medical Association (2023), Covid warrior award from Rotary and Inner wheel clubs, Women of Substance award from LIC India and Brahmakumari organisation, and Medlife Asia Top 100 Women Doctor Award.

Inspired by her father, she joined Inner Wheel District 314 in 2005 and became its youngest Club President in 2006. Her impactful tenure included





Dr Sandhya Bhat

four large-scale medical camps for over 2,000 patients, construction of toilet blocks, and a vocational workshop for Nasik Jail inmates.

Her leadership continued as District Editor (2010-11), Best District Treasurer (2012-13), and District Chairman (2015-16), overseeing projects worth ₹5 crores—including the Pinkathon with Milind Soman and a culinary contest judged by Sanjeev Kapoor. She has also served as All India Secretary and Editor for Association of Inner Wheel Clubs in India and refurbished their publications.

Currently, Dr Sandhya Bhat serves as a consultant to multiple hospitals and works to promote Cervical Cancer vaccination drives in young women.

Nivedita Chaskar breaks gender barriers in automotive industry

Nivedita Chaskar's inspiring journey began in a small village, studying in an Adivasi school under her grandmother's care. She moved to Mumbai when she was 10. In this city of dreams, her passion for learning earned her the "Student of the Year" award in grade 10. She pursued a Bachelor's and Master's in Organic Chemistry, overcoming challenges of transitioning from a vernacular background to a competitive academic world. With her father's discipline, mother's patience, and her husband's support, she now pursues a Doctorate in Business Administration at Rushford Business School, Switzerland.

With over 18 years in the automotive coatings industry, Nivedita led groundbreaking innovations, including India's first One Coat Technology for Honda and the 1KIC system on ED. She spearheaded high-impact projects with Honda, Suzuki, and Ola Electric, breaking gender barriers in a male-dominated





Nivedita Chaskar

sector with vision, grit, and leadership.

As Presiding Officer of the POSH committee, she championed workplace safety for women and inclusivity. Her Rotary Club presidency included school adoption and wellness initiatives. A marathon enthusiast, she promotes health and resilience.

An award-winning professional, her legacy lies in mentoring, innovation, and social empowerment. Inspired by Chhatrapati Shivaji Maharaj, Nivedita proves true leadership uplifts others and redefines boundaries.

नृत्याचं एक सजीव रूप - भावना लेले

भारतीय शास्त्रीय नृत्यप्रकारांमध्ये कथ्थक हा एक अत्यंत प्रभावी आणि सुंदर नृत्यप्रकार मानला जातो. कथ्थक म्हणजे कथा सांगून ही कथा नृत्याच्या माध्यमातून, भावाभिनयाच्या साहाय्याने रंगमंचावर साकारली जाते. या अद्वितीय नृत्यशैलीला समर्पित आणि जगभरात प्रसिद्ध असलेल्या नृत्यांगनांमध्ये भावना लेले यांचं नाव आदराने घेतलं जातं.

भावना लेले या अलीकडील काळातील प्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना त्यांच्या बहुपर्यायी शैलीसाठी ओळखल्या जातात. भावना लेले यांचा जन्म पुणे शहरात १९६७ मध्ये एका महाराष्ट्रीयन कुटुंबात झाला. लहानपणापासूनच त्यांना नृत्याची गोडी होती. त्यांची आई शास्त्रीय संगीताच्या पार्श्वभूमीची असल्यामुळे घरातच कलांचा सुगंध होता. सुरुवातीला त्यांनी भरतनाट्यममध्ये प्राथमिक प्रशिक्षण घेतलं, मात्र नंतर त्यांना कथ्थक नृत्याची गोडी लागली. वयाच्या आठव्या वर्षी त्यांनी कथ्थकचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यांना नाशिकच्या गुरु संजीवनी कुलकर्णी यांच्याकडे प्रशिक्षण लाभले. त्यांनी गंधर्व महाविद्यालयातून कथ्थक नृत्य विशारद (पूर्ण) ही पदवी प्राप्त केली आहे. तसेच, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथून त्यांनी कथ्थक विषयात एम.ए. पदवी मिळवली आहे. गुरु संजीवनी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कथ्थक शिक्षण घेतले असून, पं. बिरजू महाराज आणि गुरु मुन्नालालजी शुक्ला यांसारख्या दिग्गज कलाकारांचे विशेष मार्गदर्शन त्यांना लाभले आहे, ही त्यांची भाग्यप्राप्ती मानली जाते.

भावना लेले एक प्रतिभावंत कथ्थक नृत्यांगना म्हणून उदयाला आल्या. त्यांच्या नृत्यात शुद्धता, सौंदर्य आणि सखोल भावाभिनय यांचा उत्तम संगम पाहायला मिळतो. त्यांच्या नृत्यप्रस्तुतीमध्ये ताल, लय आणि भाव यांचा सुंदर समतोल असतो. त्यांनी अनेक देश-विदेशांमध्ये आपली कला सादर केली असून भारतातल्या प्रमुख नृत्य महोत्सवांमध्ये त्यांची नियमित उपस्थिती असते. खजुराहो, एलोरा, उड़ान आणि मुंबई फेस्टिव्हल यांसारख्या नृत्यप्रमुख कार्यक्रमांमध्ये त्यांनी आपल्या नृत्याने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्यांनी आपली कारकीर्द विविध शहरांमधील सादरीकरणांपासून सुरू केली. पुणे, जळगाव, हैदराबाद, इंदूर, तिरुपती, नाशिक, मुंबई आणि ठाणे येथे त्यांनी विविध नृत्य सादरीकरणे केली आहेत. त्यांनी अनेक सोलो सादरीकरणे दिली आहेत



भावना लेले यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यामध्ये एक्सलन्स पुरस्कार, तरंगरत्न पुरस्कार, शैलूशी पुरस्कार, नृत्यगौरव पुरस्कर, वुमन्स अचिव्हर्स पुरस्कार आणि सत्यभामा पुरस्कार यांचा समावेश आहे. त्यांच्या नृत्यकारकिर्दीला देश-विदेशात मान्यता मिळालेली असून, त्या भारताच्या सांस्कृतिक राजदूत म्हणूनही काम करत आहेत. नृत्यासोबतच त्यांना लेखनाची देखील आवड आहे. त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कथ्थक दर्शन १ आणि कथ्थक दर्शन २ ही पुस्तके हिंदी भाषेत प्रकाशित केली आहेत.

तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेमार्फत आयोजित पं. राम मराठे संगीत समारोहात २००६ आणि २००८ मध्ये सहभाग घेतला आहे. त्यांनी संस्कार भारतीच्या गुरुपौर्णिमा उत्सवात देखील सादरीकरण केले. २०१४ मध्ये पुण्यात झालेल्या आंतरराष्ट्रीय नृत्य दिनाच्या कार्यक्रमातही त्यांनी सहभाग घेतला होता.

नृत्यकलेच्या प्रसारासाठी त्यांनी अनेक कार्यशाळा आणि सेमिनार्स घेतले आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असून, त्यांनी पुण्यात 'भावरंग कथ्थक अकॅडमी' स्थापन केली आहे. या संस्थेमार्फत त्या नवोदित कलाकारांना व्यासपीठ, मार्गदर्शन आणि शास्त्रशुद्ध नृत्यशिक्षण देतात.

हे सर्व करताना २०१९ मध्ये त्यांना ब्रेस्ट कॅन्सरचे निदान झाले. त्यावेळी त्यांनी ठरवले की, जर यातून बाहेर पडले तर नृत्यासाठी जे जे काही करायचे राहून गेले आहे ते करायचे. नृत्याच्या ध्यासाने त्या या आजारातून बाहेर पडून जोमाने काम करीत आहेत. कथ्थक नृत्य अनेकांपर्यंत पोहोचावं यासाठी त्या प्रयत्नशील आहेत.

भावना लेले यांचं आयुष्य हे एका समर्पित कलाकाराचं प्रतीक आहे. त्यांनी केवळ एक नृत्यांगना म्हणून नव्हे, तर एक प्रेरणादायी गुरू, संशोधक आणि भारतीय संस्कृतीची वाहक म्हणूनही आपली छाप उमटवली आहे. कथ्थक नृत्याला आधुनिक पिढीपर्यंत पोहोचवण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.









Sonali Patankar develops Responsible Netism for cyber security

Can you tell us a little about your early life and what inspired you to work in the social sector?

While in school, in grade 9, as part of my social work class, I was taken to a shelter home for children. This place was a home to children abandoned by their parents, some of them had severe deformities and disabilities, some were normal. This motivated me to take up the social sector as a career. I pursued a Bachelors in Social Work, then worked with Child Rights and You ILFS, PCGT. I pursued training in school counselling and realised the value of mental wellbeing and eventually decided to start my organisation, catering to mental health, focusing on children and women, their rights, safety and wellbeing.

Tell us about the birth of NETISM. What does the name stand for?

In 2012, through our sessions in schools, very few students had access to the Internet. So we started having conversations with children and youth about their internet experiences. There were many instances of cyberbullying and online harassment. After speaking to children who were victimised, we envisioned that the internet could be a breeding ground for violence with little or no space to seek help. That's when children told us that it was important that internet users be responsible for their usage and not use it to harm others. The thought and word 'Responsible Netizens' was born and the initiative was named Responsible NEtism. We were the only organisation back then working on online safety.



What were the initial challenges and how did you overcome them?

The cause was very new, unheard of, so there was seldom any acceptance from parents, schools, funders, etc. Despite no financial support for almost 4-5 years, we continued to work with passion. We sternly believed that some day we would be acknowledged for our work and after 6 years we received support and recognition from the ministry of education and funders to create awareness about online safety in Mumbai.



Sonali Patankar

Have you noticed any change in societal attitudes towards women being digitally independent?

Though the internet is an amazing power and has given platforms and voices to many women, there are still challenges including digital gender divides, online harassment, and the persistence of gender stereotypes. We strongly feel that the internet is also highly patriarchal. Women are targeted simply because of their gender, which leads to a global concern called tech-facilitated gender based violence. The internet is polarised, being a faceless and anonymous platform, netizens feel it is their birthright to comment and write what they feel about anybody and everybody, not knowing that it can make them legally liable. We feel that the internet should be an inclusive and safe space for all.

Are there specific programmes within NETISM that focus solely on females?

Yes, the Digital Stree Shakti and Cyber Sakhi programmes are specifically designed for women and young girls for their digital empowerment, their financial inclusion and their power to grow and scale their skills globally.

How do you see the role of women changing in the tech and digital space over the next decade?

Digital transformation provides new opportunities for the empowerment of women and girls, but discrimination, negative stereotypes, and social and cultural biases create other challenges for women and girls to thrive in a highly digital economy and society. Research shows that when women enter the tech fields, it helps foster creativity and problem-solving. It also helps in setting the context of safety by design as women are safety conscious. They need to get equal opportunities to explore technology from a very young age.

What message would you like to give to young girls and women who want to be digitally empowered but lack access or confidence?

Don't be fearful of technology, embrace it with pride to shape your future and build a brighter tomorrow! Technology has incredible potential that could make you leaders, innovators and change-makers. Use the power of technology but with a balance of safety and responsibility. Join us volunteers and train people about cyber safety. Reach out to us on 8433701077 or call on our Cyber Wellness helpline – 7353107353.

Aarati Chauhan strives towards optimum mental health

Aarati Chauhan is a transformative leader in mental health and women's empowerment. As Chief Trustee of The Anni Foundation, she has built a globally recognised institution operated by women, for women, offering specialised mental health care and rehabilitation. Her foundation provides compassionate treatment for conditions such as OCD, bipolar disorder, dementia, ADHD, Alzheimer's, depression, schizophrenia, personality disorders, and intellectual disabilities. It also supports women facing drug addiction, panic attacks, and other mental health challenges, guiding them toward stability and confidence.





Aarati Chauhan

Aarati's vision extends beyond treatment to holistic rehabilitation. She has created a nurturing space for elderly women, offering not just medical care but emotional support and companionship. Her efforts ensure that women from all backgrounds receive the resources needed to heal and thrive.

Overcoming societal stigma around mental health and women's rehabilitation, Aarati has led awareness campaigns, policy dialogues, and community outreach to bring these issues into the spotlight. Her blend of professional expertise and compassion has changed countless lives.

As a global advocate, she mentors young professionals, works with policymakers, and leads initiatives that uplift underprivileged women. Aarati Chauhan's unwavering dedication has redefined mental health care and created a legacy of empowerment and hope for generations to come.

महिला सशक्तीकरणाचा अनमोल प्रवास

चाकोरीबाहेरची वाट शोधायचं धाडस असलं की खरंच आयुष्य बदलू शकतं याचं उत्तम उदाहरण म्हणजे वर्षा परचुरे! त्यांनी विशेषकरून ग्रामीण भागातील महिलांच्या सशक्तीकरणासाठी अनेक उपक्रम राबवले.

एमबीए आणि डिजिटल ह्युमन रिसोर्स मॅनेजमेंट मध्ये मास्टर्स शिक्षण घेऊन १९९९ साली बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये प्रोबेशनरी ऑफिसर म्हणून नोकरी सुरू करणाऱ्या वर्षाताईंनी केवळ बँकमध्येच न थांबता एका वेगळ्या वाटेचा प्रवास निवडला. जीवनविकास संस्था आणि जीवन विकास सरसच्या संस्थासंयोजक म्हणून त्यांनी काम केले आणि अनेक एनजीओ सोबतही काम केले. ग्रामीण भागातील विशेषतः महिलांच्या सशक्तीकरणासाठी अनेक उपक्रम राबवले, प्रशिक्षण दिलं.

२०१४ साली ग्रामीण आणि डोंगराळ भागात काम करायचं त्यांनी ठरवलं आणि यासाठी मोखाडा तालुका निवडला. दुसरी बाजू म्हणजे ग्रामीण महिलांसाठी कमीत कमी खर्चात, त्यांना समजेल अशा भाषेत व त्यांच्या सोयीच्या वेळेत नोकरी, व्यवसाय, आत्मनिर्भरता यासाठी अनेक उपक्रम वर्षाताईंनी सुरू केले. २०१४ मध्ये त्यांनी परिवर्तन महिला संस्था सुरू केली. त्या संस्थेच्या अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांसाठी विविध उपक्रम आयोजित केले आणि महिलांसाठी रोजगारनिर्मिती, आत्मनिर्भरतेसाठी कार्य केलं.

मोखाड्यासारख्या आदिवासी भागातील नागरिकांच्या विकासासाठी, तिथल्या जनतेसाठी परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्याचं काम



वर्षा परचुरे

वर्षाताई करत आहेत. हेल्थ सेस, मोबाईल क्लिनिक, पोषण आहार आणि महिलांना बचतगटाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणं हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे भाग आहेत. गावकुसाच्या बाहेरच्या लोकांना मोखाडा म्हणजे खालचा दर्जा वाटत होता पण या भागाचा बदल घडवून आणण्यासाठी वर्षाताईंनी विविध संस्था, शासकीय अधिकारी, पत्रकार, मीडिया, देशी आणि परदेशी संस्था, डॉक्टर, शिक्षणतज्ज्ञ, पोषणतज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वयंसेवक यांचा समूह तयार केला. या समूहाचा वापर करून त्यांनी ग्रामीण भागात शिक्षण, पोषण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, रोजगार, शेती, पर्यावरण, आदिवासी संस्कृती इत्यादींसाठी अनेक उपक्रम राबवले. यामध्ये विशेष म्हणजे गावकुसाबाहेरील लोकांनी गावातील महिलांना प्रशिक्षक, शिक्षक म्हणून ओळखायला सुरुवात केली. आज २० गावातील ५०० पेक्षा जास्त महिला वर्षाताईंनी सुरु केलेल्या उपक्रमात सहभागी आहेत.

मोखाडा तालुक्यात "देव्याणी" या ब्रॅण्डखाली सत्तावीस उत्पादनांची विक्री होत आहे. ५०० कुटुंब दरमहिना काही ना काही उत्पन्न मिळवत आहेत. २००० मुलींसाठी व्यावसायिक प्रशिक्षण दिलं जात आहे. मोखाड्यातील महिलांनी तयार केलेल्या वस्तू, साडीवरची नक्षी, सेंद्रिय शेती, भाजीपाल्याचे उत्पादन, शेळीपालन यांना आता बाजारपेठ मिळाली आहे. आज मोखाड्यातील आदिवासी स्त्रियांमध्ये एक वेगळाच आत्मविश्वास दिसतो. कित्येकवेळा डोंगर दऱ्यांतून चालत जाऊन, २-२ तास प्रवास करून त्या प्रशिक्षणासाठी पोहोचल्या आहेत. शेती आणि व्यवसायातून त्यांना आता उत्पन्न मिळत आहे. स्वतः काहीतरी केलं याचा अभिमान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. वर्षाताईंनी त्यांना स्वाभिमानी बनवलं आहे.

वर्षाताईंनी सुरू केलेल्या "चातकतेतून कात टाकणाऱ्या स्त्रिया" या कार्यक्रमानेही खूप मोठा परिणाम झाला आहे. "चातक" या बाणावरून "चातक" नावाचा ग्रुप तयार झाला आहे. आज त्यांच्या चातक टीममध्ये १५ प्रशिक्षक महिला आहेत. त्या इतर महिलांना प्रशिक्षण देतात आणि स्वतः त्यातून उत्पन्नही कमावतात.

Architect Suvarna Ghosh:

A Journey of Grit, Creativity and Independence



In a field traditionally dominated by men, Architect Suvarna Ghosh has emerged as a formidable force, carving a distinctive niche through perseverance, innovation, and integrity. With no family background in architecture, her journey began almost serendipitously — she chose the path because a friend was pursuing it. But what started on a whim soon became a lifelong passion.

A graduate of L.S. Raheja School of Architecture (1990–91), Suvarna refined her craft under the mentorship of respected architects Shashikant Deshmukh and Ulhas Pradhan. Her first major breakthrough came with the Gaurinandan Building project at Panchpakhadi, followed by her first high-rise assignment from the Cosmos Group — a partnership that would span numerous landmark developments.

Over the decades, Suvarna has shaped the skyline of Thane with over a hundred residential, commercial, and institutional projects. Some of her most notable works include Cosmos Horizon, Bethany Hospital, Cosmos Jewels, and her personal favourite — Cosmos Hawaiian. Thanekars would recognise several of her other contributions: Rosa Classique, Rosa Royale and Oasis, Empress Park, The Universe, The Residency, Cosmos Pride, Rosa Elite, Cosmos Springs, Cosmos County, to name a few.

Notably, Suvarna is the first woman architect to independently practice for nearly three decades in the Thane Municipal Corporation — a milestone in local architect community.

Today, her firm delivers turnkey projects that span the full arc from design to execution. Known for compliance-driven, innovative solutions, Suvarna's design philosophy emphasises that architecture must reflect the client's values, lifestyle, and needs — not merely the architect's aesthetic.

Navigating an ever-evolving real estate sector, Suvarna acknowledges the challenges: increasing land costs, shifting regulations, and a male-centric industry culture. Yet, she sees promise in the sector's gradual shift toward more inclusive and transparent policies. Despite architecture being a profession where many women excel academically, few choose to practice independently — something she encourages aspiring women architects to change.

Suvarna advises, "Women should definitely join the industry in large numbers and not be afraid of starting their own independent practice and be role model for the next generation of women architects."

With her daughter Drishti, a trained landscape architect, Suvarna now envisions launching a sustainable, eco-housing project — a testament to her evolving aspirations and intergenerational commitment to responsible design.

For Suvarna Ghosh, success is not just about buildings, awards, or financial gain. It's about leaving a legacy — one that empowers women, transforms urban spaces, and inspires the architects of tomorrow.

जयश्री कलेक्शन : सौंदर्य, स्वावलंबन आणि संस्कृतीचा संगम

आजच्या काळात महिलांनी स्वतःचा व्यवसाय उभारणे ही केवळ आत्मनिर्भरतेची वाट नसून, ती सामाजिक बदल घडवण्याचीही प्रेरणादायी कहाणी ठरते. अशाच एका प्रेरणादायी प्रवासाची नायिका म्हणजे जयश्री रामाणे, यांनी 'जयश्री कलेक्शन' या इमिटेशन ज्वेलरी व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. आणि बघता बघता या छोट्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर झाले.

फॅशनची आवड, स्त्रियांच्या गरजांची जाण आणि सामाजिक भान यांचा मिलाफ असलेला त्यांचा व्यवसाय आज केवळ दागिन्यांचा पुरवठा करत नाही, तर अनेक महिलांना रोजगार, आत्मविश्वास आणि नव्या संधीही निर्माण करून देतो. त्यांच्या या प्रवासातील प्रेरणा, आव्हाने, शिकवण्या आणि भविष्यातील स्वप्नांची रंगीत झलक यातून उलगडणार आहोत.

व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा तुम्हाला कशी मिळाली?


स्वतःच्या आयुष्यावर नियंत्रण ठेवण्याची इच्छा आणि समाजासाठी काही अर्थपूर्ण करायची ऊर्मी यातून हा व्यवसाय सुरू झाला. नोकरीतील मर्यादा, श्रेय न मिळणं आणि निर्णय स्वातंत्र्याचा अभाव यामुळे स्वतःचं काहीतरी सुरू करावंसं वाटलं. इमिटेशन ज्वेलरी व्यवसाय सुरू करण्यामागे माझी फॅशनमधली रुची, दागिन्यांची आवड आणि महिलांच्या गरजा समजून घेण्याची दृष्टी होती. सोनं-चांदी परवडत नसल्यामुळे इमिटेशन ज्वेलरीला मोठी मागणी आहे. या व्यवसायातून महिलांना रोजगार, स्वावलंबन आणि त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ देणं हे माझं मुख्य उद्दिष्ट आहे.

व्यवसाय सुरू करताना सुरुवातीच्या काळात तुम्हाला कोणती आव्हाने आली?

इमिटेशन ज्वेलरीचा व्यवसाय सुरू करताना मला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. सर्वात पहिले होतं दर्जेदार आणि वेळेवर डिलिव्हरी करणाऱ्या विश्वासार्ह पुरवठादारांचा अभाव. दुसरं आव्हान होतं ब्रँडची ओळख निर्माण करणं, स्पर्धात्मक बाजारात टिकण्यासाठी सोशल मीडिया, प्रदर्शनं आणि ग्राहकांचा विश्वास मिळवण्यासाठी खूप मेहनत घेतली. तिसरं आव्हान होतं भांडवलाची कमतरता. नवीन डिझाईन्स, स्टॉक आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मसाठी आर्थिक अडचणी आल्या. महिला उद्योजिका म्हणून विश्वास मिळवणं हेही एक मानसिक आव्हान होतं. मात्र चिकाटी, सातत्य आणि गुणवत्ता या जोरावर मी या सगळ्यावर मात केली.

व्यवसाय करताना तुम्ही कोणते महत्त्वाचे धडे शिकलात?

- **गुणवत्तेवर तडजोड नाही** - टिकाऊ व सुंदर दागिन्यांची गुणवत्ता टिकवणं म्हणजेच खरी ब्रँडिंग.
- **ट्रेंडनुसार अपडेट राहा** - बाजारातील बदल लक्षात घेऊन उत्पादन व विक्रीत लवचिकता आवश्यक.
- **ग्राहकसेवा ही खरी ओळख** - विक्रीनंतरची सेवा समाधानकारक असेल तर ग्राहक पुन्हा येतो.





जयश्री रामाणे

- **शिस्त व नियमितता** - वेळेचं नियोजन व व्यवस्थापन केल्याशिवाय व्यवसाय वाढत नाही.
- **नेटवर्किंगचे महत्त्व** - सहकार्य आणि चांगले संबंध नव्या संधी निर्माण करतात.
- **ऑनलाइन उपस्थिती आवश्यक**- डिजिटल प्लॅटफॉर्मवर सक्रिय राहिल्याने ब्रँडचा विस्तार होतो.

म्हणून व्यवसाय म्हणजे नफा नव्हे, तर सतत शिकणं, सुधारणं आणि इतरांना आनंद देणं हेच यशाचे खरे मोजमाप आहे.

एक महिला व्यावसायिक म्हणून तुम्हाला समाजात किंवा उद्योगविश्वात काही वेगळ्या प्रकारची आव्हाने जाणवली का?

इमिटेशन ज्वेलरीसारख्या सौंदर्याशी संबंधित व्यवसायात एक महिला उद्योजिका म्हणून काम करताना मला अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. सुरुवातीला लोकांनी या व्यवसायाला केवळ छंद म्हणून पाहिलं आणि माझ्या व्यावसायिक क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं. संधी मिळवताना एक महिला म्हणून अडथळे आले, तर कुटुंब आणि व्यवसाय यांच्यात संतुलन साधणंही एक मोठं आव्हान होतं. मात्र या सर्व अडचणींना मी संधी मानून घेतलं आणि व्यवसायात गुणवत्ता, व्यावसायिकता आणि सेवा यांना प्राधान्य देत पुढे गेले. आज जे यश मिळालं आहे, ते या कठोर प्रवासामुळेच अधिक अर्थपूर्ण वाटतं.

महिलांसाठी अधिक संधी निर्माण करण्यासाठी तुम्ही काय उपाययोजना करता?

माझ्या इमिटेशन ज्वेलरी व्यवसायाचं मुख्य उद्दिष्ट म्हणजे महिलांसाठी रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणं. अनेक स्त्रियांमध्ये कौशल्य असूनही योग्य संधीचा अभाव असतो, म्हणूनच घरकाम करणाऱ्या महिलांना प्राधान्य - पॅकिंग, सोशल मीडिया, कस्टमर सपोर्टसारखी कामं घरबसल्या करता येतील अशा महिलांना संधी दिली.

- **हस्तकला असलेल्या महिलांना प्लॅटफॉर्म** - दागिने बनवणाऱ्या महिलांना माझ्या ब्रँडअंतर्गत विक्रीची संधी व मार्गदर्शन केले जाते.
- **वर्कशॉप्स व ट्रेनिंग प्रोग्रॅम्स** - व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक कौशल्य शिकवणारे कार्यक्रम आयोजित केले.
- **प्रेरणादायी अनुभव शेअर करणं** - स्वतःचे संघर्ष आणि यश सांगून इतर महिलांना पुढे येण्यासाठी प्रेरणा दिली.
- **योग्य पगार व स्वतंत्र वेळा** - कामाच्या योग्य मोबदल्यासह महिलांच्या गरजांनुसार स्वतंत्र वेळांची सुविधा दिली.

हे सगळं करताना माझं ध्येय एकच होतं, ते म्हणजे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणं आणि त्यांच्या कलागुणांना व्यवसायाच्या रूपात वाव देणं.

टीमचे नेतृत्व करताना कोणती तत्वे पाळता?

इमिटेशन ज्वेलरी व्यवसायात मी टीमचं नेतृत्व करताना काही ठाम तत्त्वांवर विश्वास ठेवते :

- **समान संधी आणि सन्मान** - प्रत्येकाला आदराने वागवणं, मताला महत्व देणं.
- **स्पष्ट संवाद** - उद्दिष्ट, वेळमर्यादा याबाबत पारदर्शकता ठेवून कामात एकोप्यानं वाढ.
- **चुकांतून शिकणं** - रागावण्यापेक्षा चुका सुधारण्याची संधी देणं.
- **स्वावलंबन** - टीमवर विश्वास ठेवून निर्णयस्वातंत्र्य देणं.
- **प्रोत्साहन** - कौतुक, लहान गिफ्ट्सद्वारे प्रेरणा देणं.
- **सतत शिकणं** - ट्रेंड्स, ग्राहक गरजा याबाबत सतत अपडेट राहणं.

या तत्त्वांमुळे आमची टीम फक्त काम करणारी नसून, एकत्र स्वप्न पाहणारी आणि ती पूर्ण करणारी बनली आहे.

पुढील काही वर्षांत तुम्ही तुमच्या व्यवसायाला कुठे पाहता?

पुढील काही वर्षांत, माझं स्वप्न आहे की माझा इमिटेशन ज्वेलरी व्यवसाय एक मजबूत, विश्वासार्ह आणि ओळख निर्माण केलेला भारतीय ब्रँड व्हावा – जो दागिन्यांच्या विक्रीपुरता मर्यादित न राहता भारतीय परंपरा, सांस्कृतिक विविधता आणि आधुनिकतेचा सुंदर संगम सादर करतो. ऑनलाईन (वेबसाइट, Amazon, Flipkart) आणि ऑफलाईन (रिटेल स्टोअर्स) माध्यमांतून प्रत्येक राज्याच्या सांस्कृतिक गरजांनुसार दागिन्यांचे डिझाईन तयार करणे, स्थानिक भाषांमध्ये विपणन, मजबूत वितरण व्यवस्था निर्माण करणे, राष्ट्रीय प्रदर्शनांत सहभाग आणि ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर विस्तार अशा विविध पातळ्यांवर ब्रँड उभारण्याचा माझा निर्धार आहे. याशिवाय, महिलांना रोजगार व उद्योजकतेच्या संधी देणारे प्रशिक्षण केंद्र सुरू करणे, पर्यावरणपूरक उत्पादनांचा वापर आणि पारंपरिकतेला स्पर्श असलेली ट्रेंडी डिझाईन ही माझ्या ब्रँडची ओळख असेल. माझं ध्येय आहे - एक आर्थिकदृष्ट्या यशस्वी, सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि आधुनिक भारताचं सौंदर्य जागतिक स्तरावर पोहोचवणारा अद्वितीय ब्रँड उभा करणं.

नवीन उद्योग सुरू करू इच्छिणाऱ्या तरुणींना तुम्ही कोणते सल्ले द्याल?

इमिटेशन ज्वेलरी व्यवसायात यशस्वी होण्यासाठी ही तत्त्वं लक्षात ठेवली पाहिजेत.

- **गुणवत्तेवर तडजोड करू नका** – दीर्घकाळ टिकणारा व्यवसाय उभारायचा असेल तर दर्जेदार दागिनेच निवडा. ग्राहकांचा विश्वास आणि पुनरागमन हे गुणवत्ता सुनिश्चित केल्यावरच मिळते.
- **सोशल मीडियाचा प्रभावी वापर करा** – इंस्टाग्राम, फेसबुक, पिंटरेस्टवर आकर्षक फोटो, ग्राहक अनुभव आणि ट्रेंडिंग कंटेंट शेअर करून तुमचा ब्रँड लोकप्रिय करा.
- **नवीन ट्रेंड्सवर लक्ष ठेवा** – फॅशनमध्ये सातत्याने बदल होत असतो. ग्राहकांच्या आवडीनिवडी समजून उत्पादनात नवनवीन डिझाईन्स आणा.

हे तत्त्वं पाळून तुम्ही तुमचा ब्रँड यशस्वीपणे उभा करू शकता.



Rajshri Aher inspires with her multifaceted personality

Rajshri Sachin Aher, born on November 24, 1982, is an inspiring educator and community leader. Holding an MA in Sanskrit, an MA in Marathi, a B.Ed. in Sanskrit, and a Diploma in School Management, she has dedicated herself to shaping young minds. Since 2009, she has been serving as an Assistant Teacher at Saraswati Vidyalaya, Kanjurmarg (East), teaching Sanskrit and History, mentoring educators, and contributing to teacher training programmes. Her excellence earned her recognition from Education Officer Mr Mustaq Sheikh and the Best Teacher Award (2022–23) from Bhandup Medicos Community Welfare Society. Recently she received **राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार.**

Beyond academics, Rajshri is a dynamic social contributor. As a member of the Rotary Club of Amara Thane, she has led initiatives such as blood donation camps, women empowerment programmes, and cultural events. She will serve as Club President for 2025–26. She's also active in Urja Sakhi Foundation, supporting medical camps and welfare activities.

An accomplished dancer and public speaker, Rajshri has won Manglagaur competitions and anchors various cultural events. A marathon enthusiast, she values health and perseverance. Her husband Sachin and daughter Swanandi, President of the Interact Club, support and share her passion for service. Rajshri's life exemplifies dedication, leadership, and community impact.

लेखन एक आत्मशोधाची वाटचाल : हर्षदा बोरकर

लेखन ही केवळ अभिव्यक्ती नसून, अनेकांच्या दृष्टीने तो एक आत्मशोध असतो. अशाच संवेदनशील, अनुभवसंपन्न आणि भाषेप्रती प्रेम असलेल्या लेखिका म्हणजे हर्षदा बोरकर. त्यांच्या लेखनाची सुरुवात अनुभवांमधून आणि मनाच्या खोल भावनिक प्रवाहांमधून झाली आहे. लहानपणापासूनच मनात अनेक विचारांचे वादळ सुरू असायचे आणि त्यांना शब्दरूप देणं हा त्यांच्यासाठी एक प्रकारचा अंतर्मुख प्रवास ठरला.

हर्षदा बोरकर यांच्या लेखनाची बीजं त्यांच्या घरातूनच पेरली गेली. त्यांची आजी कीर्तनकार होती, गोष्टी रंगवून सांगणारी, भजन गाणारी. वडील तबलावादक होते. घरात सातत्याने सुसंस्कृत वातावरण, चांगल्या कलाकारांचा सहवास लाभला. हीच पार्श्वभूमी त्यांच्या मनात गहिरी झाली आणि लेखनाचा पाया अधिक मजबूत झाला. सरस्वती सेकेंडरी स्कूलमध्ये शिक्षण घेताना त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी आणि संस्कृत अशा चार भाषांची गोडी लागली. निबंध लेखन, मुद्यांवरून गोष्टी तयार करणं, संदर्भांसह



विचार मांडणं यांचा त्यांनी मनापासून अभ्यास केला. त्याचसोबत पत्रलेखनाची सवय लागली आणि शब्दांशी जवळीक वाढत गेली.

हर्षदा बोरकर यांची लेखनशैली संवादात्मक आहे. त्यांच्या कविता आणि कथा केवळ मनोरंजनापुरत्या न राहता अंतर्मुख करणाऱ्या असतात. त्यांच्या सासऱ्यांच्या लेखनप्रवृत्तीचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. याशिवाय त्यांनी निवेदन क्षेत्रातही आपलं योगदान दिलं आहे. विविध कार्यक्रमांसाठी संहितालेखन करताना त्यांनी संदर्भाधारित वाचन केलं, ज्यामुळे निवेदन अधिक प्रभावी आणि समर्पक बनलं. पु. ल. देशपांडे यांचे लेखन त्यांना खास भावते. त्यांची विनोदी शैली, मनाचा ठाव घेणारी भाषाशैली आणि मानवतेचा स्पर्श हर्षदा



हर्षदा बोरकर

बोरकर यांच्या लेखनावर स्पष्टपणे उमटतो. तसेच संत साहित्य आणि कथांचा त्यांच्यावर खोल प्रभाव आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनात अधूनमधून आध्यात्मिकता डोकावते.

त्यांना लेखनप्रक्रियेतील सर्वात आनंदाचा क्षण तो वाटतो, जेव्हा मनात असलेल्या भावनेला योग्य शब्द सापडतो. ती जाणीव, तो क्षण त्यांच्यासाठी जादूई असतो. शब्द आणि भावना यांचा मिलाफ जेव्हा साधतो, तेव्हा ती कविता, ती गोष्ट वाचकाच्या हृदयात थेट पोहोचते असे त्या म्हणतात. सुरुवातीला त्यांचं लेखन स्वतःपुरतं होतं. वैयक्तिक अनुभव, भावना आणि आत्मचिंतन. पण काळानुसार त्यांच्या अनुभवांचा आवाका वाढला, भाषेचा पोत अधिक सखोल झाला आणि लेखन अधिक व्यापक, समजूतदार बनलं. लेखनशैली अधिक सहज, प्रभावी बनली.

आपल्या लेखनातून वाचकांनी स्वतःचा शोध घ्यावा, अंतर्मुख व्हावं, वेदनांना शब्द गवसावा, असे त्यांना वाटते. काही क्षण थांबून आत्मपरीक्षण करण्याची संधी त्यांच्या शब्दांतून मिळावी, हाच त्यांच्या लेखनाचा उद्देश आहे.

Pursue your passion, it makes life a celebration: Sharmila Madiwale

Sharmila Madiwale is a distinguished academician and Principal of C.P. Goenka International School, Thane. With Master's degrees in English Literature and Ancient Indian Culture, a B.Ed., a Journalism qualification, and a Cambridge International Diploma for Teachers and Trainers, she brings depth and excellence to education. She has expertise across ICSE, ISC, IGCSE, and A-Level curricula and is a renowned career counsellor.

An accomplished author, she has written English Grammar and Scholarship Practice books and contributed voiceovers and educational content to make learning accessible. Her accolades include the Best Teacher Award, Principal of the Year (2024), Most Inspiring Woman Award, Kartutvavaan Mahila Award, and Best Singer Award. Her leadership has earned her school multiple accolades.

Sharmila's media career includes work with Doordarshan as a newsreader and voice-over artist. A passionate singer, she's also committed to spirituality through Pranic Healing and the Yogoda Satsang Society.

Her community efforts include adult literacy, rural teacher training, Ashram Shala visits, lake conservation, and humanitarian aid under projects like Jal-Sanjivani. Married to Rtn Shyam Madiwale, with son Rtn Arch Rigved Madiwale, she enjoys unwavering family support.

Sharmila is a visionary educator and compassionate leader empowering lives through knowledge, service, and cultural preservation.





Sharmila Madiwale is a passionate singer who believes that balancing passion with life turns it into a celebration. She believes that pursuing one's passion gives emotional and mental peace. Music runs in her family too—her husband and son, both architects, are also good singers. She recently started her own music studio named 'Connoisseur's Music Studios'. She shares her message that, "Pursue your passion—it makes life a celebration."



Dr Leena Dhande advocates "Healing with Purpose"

Dr Leena Dhande, a dedicated physiotherapist from Ambernath, has built a remarkable career rooted in passion and perseverance. A bright student from a Marathi medium school named 'Ulhas Vidyalaya,' she pursued her degree at Pravara Institute of Medical Sciences, Loni (Ahmednagar), and went on to complete both her Bachelors and Masters in Orthopaedic and Sports Physiotherapy.

With over 12 years of clinical experience, Dr Dhande runs two successful private clinics — Sai Care Physiotherapy and Rehabilitation Centre and the newly launched Sai Child Rehab Setup. She has worked with football and cricket teams, always striving to treat not just bodies, but empower minds. Her husband, Tejas Dhande, a navy officer, has consistently supported and encouraged her in every possible way.

Dr Dhande was the first woman president of the Rotary Club of Ambernath and is



Dr Leena Dhande

currently the Zonal Coordinator for the Inner Wheel Club. She has received several honours including Best Doctor, Best Female Entrepreneur, and the Ambernath Gaurav Award.

Having conducted over 60 ergonomic sessions, she credits her medical family and supportive husband for her success. Her message to aspiring female physiotherapists: "Stay true to your passion. Know your worth. You're not just healing — you're inspiring."

ठाण्याची मॅजिक क्वीन : मधुगंधा इंद्रजित







जगात अनेक कला आहेत, पण त्यापैकी "जादू" ही एक विलक्षण आणि अद्भुत कला आहे. प्रत्येकालाच ती साध्य होते असे नाही. या कलेत केवळ हातचलाखी नाही तर बारकावे, समज आणि प्रेक्षकांशी संवाद यांचा समावेश असतो. अशा या कलेला आयुष्य समजून तिला जीवनाचे मिशन मानणाऱ्या ठाण्यातील प्रसिद्ध जादूगार इंद्रजित यांची कन्या म्हणजे मधुगंधा इंद्रजित.

लहानपणापासूनच मधुगंधा यांनी वडिलांसोबत जादूचे प्रयोग पाहिले आणि अनुभवले. त्यांना लहान वयातच जादूची गोडी लागली. वडिलांसोबत प्रयोगात सहभागी होत त्या हळूहळू स्वतःही प्रयोग करू लागल्या. केवळ प्रयोग करण्यापुरतेच नव्हे, तर त्यांनी इतर कलाकारांना जादू शिकवणेही सुरू केले. विशेष म्हणजे १२ वर्षांपासून ६५ वर्षांपर्यंतच्या वयोगटातील लोक त्यांच्याकडे जादू शिकायला यायला लागले. जादूच्या प्रयोगांप्रमाणेच अभिनय आणि नृत्य यामध्येही त्यांना लहानपणापासून रस होता. त्यांनी अनेक मराठी दिग्गज कलाकारांसोबत रंगभूमीवर काम केले आहे. मात्र, त्यांच्या वडिलांनी त्यांना समजावले की, जादूच्या क्षेत्रात बहुतांश वेळा पुरूष कलाकारच दिसतात. त्यामुळे तू जर या क्षेत्रात ठाम राहिलीस तर तुला निश्चितच ओळख मिळेल. वडिलांच्या या प्रेरणेने त्यांनी आपले लक्ष जादूच्या कलेकडे केंद्रित केले.

१९८३ साली जबलपूर येथे भरवण्यात आलेल्या अखिल भारतीय महिला जादू स्पर्धेने त्यांच्या आयुष्याला कलाटणी दिली. महाराष्ट्रातून कोणीही महिला सहभागी नव्हती, तेव्हा वडिलांनी केवळ आठ दिवसांत त्यांना तयार करून स्पर्धेत भाग घ्यायला लावला. ४० स्पर्धकांमधून त्यांनी "मॅजिक क्वीन" हा किताब पटकावला. हा किताब आजपर्यंत कोणीही पुन्हा मिळवलेला नाही. त्यानंतर मधुगंधा यांनी वडील आणि भावासोबत भारतात तसेच सिंगापूर, मलेशिया, दुबई आदी परदेशांत जादूचे कार्यक्रम सादर केले. देशपातळीवरील स्पर्धांमध्ये भाग घेऊन त्यांनी अनेकदा प्रथम क्रमांक मिळवला आहे. त्यांच्या वडिलांच्या निधनानंतर एका स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून त्यांना सन्मानाने आमंत्रित करण्यात आले होते. वडील हेच आपले पहिले गुरू असल्याने त्यांनी मिळवलेला हा सन्मान वडिलांना अर्पण केला.

आजही त्या नवतरुणांना या क्षेत्रात येण्यासाठी प्रेरित करतात. "जादू हा एक व्यवसायही असू शकतो आणि आनंद देण्याचे माध्यमही," असे त्या सांगतात. आपल्या कलाकौशल्याने प्रेक्षकांचे मनोरंजन करत त्यांनी ही कला पुढील पिढीकडे पोहोचवली आहे. मधुगंधा इंद्रजित या केवळ एक जादूगार नाहीत, तर त्या जादूच्या माध्यमातून समाजाला आनंद देणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत.

मधुगंधा इंद्रजित यांनी केवळ मनोरंजनापुरती जादू न शिकता, तिचा वापर सामाजिक जाणिवेसाठी केला. ठाण्यातील अंध विद्यार्थ्यांच्या शाळा, वृद्धाश्रम आणि दिव्यांगांसाठी जादू प्रयोग सादर करून त्यांनी निखळ आनंद दिला. जादूच्या प्रयोगांसोबतच त्यांच्या अभिनय आणि नृत्याच्या आवडीला अनुसरून त्यांनी अनेक कार्यक्रमांमध्ये निवेदिकेची भूमिका स्वीकारली. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये निवेदन करत करत त्यांनी जादूच्या कार्यक्रमांचेही निवेदन सुरू केले. आज त्या जादूगार आणि निवेदिका या दोन्ही भूमिकांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक मान्यताप्राप्त पुरस्कार पटकावले आहेत. १९८४ साली दिल्ली येथे "मॅजिक अवॉर्ड", १९८५ मध्ये उदयपूर येथे "जादू रत्न", तर मुंबई, कोलकाता, गुजरात येथे पुरुष-महिला खुल्या स्पर्धांमध्ये प्रथम पारितोषिक मिळवले आहे. १९८६ मध्ये "अपना उत्सव"मध्ये पंतप्रधान राजीव गांधी यांच्यासमोर त्यांनी कला सादर केली. १९८७ साली प्रसिद्ध जादूगार के. लाल यांच्या हस्ते त्यांना सन्मान मिळाला. त्यानंतर "ठाणे मनोदय गौरव", "जादू संजीवनी", "मॅजिक क्वीन ऑफ भोपाल", "लोकमत सखी पुरस्कार", "नवदुर्गा पुरस्कार", "मायाजाल पुरस्कार" यांसह अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे.

Vinaya Hebbar shapes young minds

Vinaya Hebbar was born on 23rd August 1967 in Manjeshwara, Kerala. Vinaya grew up in a traditional Shivalli family where discipline, compassion, and service were deeply valued. Guided by her mother's principles and enriched by Bharatanatyam training, she developed confidence and a disciplined lifestyle. After schooling in Mangalore, she completed a B.A. from Dawangiri and an M.A. in History from Mangalore University. Post-marriage to Vadiraj Hebbar of the Kattingeri Hebbar family, she pursued further studies—earning an M.A. in English Literature, a B.Ed., and a PG Diploma in School Management.





Vinaya Hebbar

In 1991, she founded "Masoom Kids" Play School and "Nikita Tutorials," impacting hundreds of young minds. She also lectured at Radhikabai Meghe B.Ed & D.Ed College and taught at VPM's International School, earning the "Best Senior Teacher Award." She worked with NMMC to reduce school dropouts and introduced mentoring and yoga programmes to aid underprivileged and learning-disabled students.

Surviving a brain stroke at 45, Vinaya recovered through yoga and meditation. A Rotarian and Inner Wheel member since 2008, she led impactful projects during her presidencies, including COVID relief, cataract surgeries, and school development. Now District Literacy Chair (2025-26), she continues serving society with passion, offering free education to children of community helpers.

Dr Shakuntala Churi personifies noble medical service

Dr Shakuntala Raghunandan Churi's life is a testament to perseverance and service. Born in a farmer's family in Kelwa, Mahim (Palghar), her calling to medicine came early, inspired by her mother administering first aid. A brilliant student, she pursued M.B.B.S. and D.C.H. from Grant Medical College, J.J. Hospital, Mumbai, encouraged by her socially active parents.



Rejecting specialisation opportunities, she chose to serve Badlapur, then lacking basic infrastructure and medical facilities. Starting her practice in 1973 with a toddler and in a modest one-room home, she faced immense challenges. Her husband, Mr Raghunandan Churi, a UDCT topper and Leeds University alumnus, stood by her throughout.



Dr Shakuntala Churi

Initially specialising in child health, she expanded into general medicine to meet the needs of women and underserved communities. Known for never turning away even those who couldn't pay, she earned deep respect through free medical camps and tireless service.

Dr Churi held esteemed positions including President of KBMA and the Rotary Club of Badlapur Industrial Area, and Assistant Governor of Rotary District 3142. Honoured with awards like Samaj Bhushan Puraskar and Samaj Arogya Mata, she continues at 79 to lecture and inspire.

A doctor, leader, and humanitarian—Dr Churi's legacy embodies selfless service.

चेतना सिंग : समर्पण, ध्येय आणि जिद्दीचा प्रवास

बास्केटबॉलमध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केलेल्या क्रीडाप्रेमी म्हणून ओळख असलेल्या चेतना सिंग यांनी एमबीए प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून मानव संसाधन (HR) व विपणन (Marketing) या क्षेत्रात विशेष पदवी घेऊन सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कोर्स पूर्ण करत आता त्या कॉर्पोरेट क्षेत्रात नावलौकिक मिळवत आहेत.

चेतना सिंग यांचे बालपण त्यांच्या वडिलांच्या सिंचन विभागातील बदलत्या नोकरीमुळे विविध शहरांमध्ये गेले. विविध संस्कृतींचा अनुभव मिळाल्यामुळे त्यांच्यात जुळवून घेण्याची क्षमता आणि सामाजिक कौशल्ये विकसित झाली. त्यांच्या आजोळच्या सुट्ट्यांच्या आठवणी त्यांच्यासाठी आजही खास आहेत. त्यांचे आजोबा एक प्रसिद्ध लेखक आणि कवी होते. घरात होणाऱ्या बौद्धिक चर्चासत्रांतून चेतना यांच्या विचारविश्वावर खोल प्रभाव पडला. रामायण आणि महाभारत यांसारख्या महाकाव्यांमुळे त्यांच्या मूल्यांना आकार मिळाला, तर त्यांच्या आईच्या निसर्गप्रेमामुळे पर्यावरणाविषयीची जाणीव रुजली.



क्रीडाप्रेमी चेतना सिंग लहानपणी आपल्या चुलत भावांसोबत क्रिकेट खेळत असत आणि पुढे जाऊन त्यांनी बास्केटबॉलमध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केले. इलेक्ट्रॉनिक्स शाखेत पदवी घेतल्यानंतर त्यांनी एमबीए प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून मानव संसाधन (HR) व विपणन (Marketing) या क्षेत्रात विशेष पदवी घेतली. IBM ACE या संस्थेतून एक जलद सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कोर्स पूर्ण करून त्यांनी IBM इंटरनॅशनलमध्ये आपल्या करिअरची सुरुवात केली. पुढे Convergys आणि Concentrix या आघाडीच्या कंपन्यांमध्ये त्यांनी नेतृत्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या.

कॉर्पोरेट क्षेत्रात काम करताना त्यांनी कोच, ट्रेनर आणि HR मॅनेजमेंटसारख्या भूमिका निभावत आपल्या सहकाऱ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेनुसार कामगिरी करण्यासाठी प्रेरित केले. त्यांनी CSR (Corporate Social Responsibility) उपक्रमांतही सक्रिय सहभाग घेतला. करिअर ब्रेकनंतर, आपल्या दोन मुलांना वाढवताना त्यांनी Green Ocean आणि BG Apparels या उद्योजकतेच्या प्रवासाची सुरुवात केली. एक स्व-प्रशिक्षित कलाकार म्हणून त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. २०२१ मध्ये त्यांनी रोटरीमध्ये प्रवेश केला आणि रोटरी क्लब ऑफ हिरानंदानी आयव्हानच्या संस्थापक अध्यक्षा म्हणून सामाजिक व पर्यावरणीय उपक्रमांना दिशा दिली.

"यश अंतिम नाही, अपयश घातक नाही. महत्वाचं म्हणजे पुढे जात राहण्याचे धैर्य असायला हवे." हा विन्स्टन चर्चिल यांचा विचार पुढे ठेऊन संकटांना सामोरे जात चेतना सिंग यांनी ध्येय मनात ठेवले आहे.



चेतना सिंग

पर्यावरण संवर्धनाविषयी त्यांची एक वेगळीच तळमळ आहे. त्यांना असे वाटते की, पृथ्वीला अधिक स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागायला हवे. एक उत्साही ट्रेकर म्हणून, निसर्गात विखुरलेले प्लास्टिक आणि कचरा पाहून त्यांना दुःख होते. त्यांचे पती विनय प्रताप सिंग हे एका युरोपियन मल्टिनॅशनल कंपनीमध्ये कार्यरत आहेत. त्यांना दोन मुले आहेत. मुलगी इंजिनिअर असून MBA पूर्ण करून IT कंपनीत कार्यरत आहे, तर मुलगा इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे.

Vasanti Gokani honoured with Lady Singham, Dadasaheb Phalke awards and many others







Vasanti Gokani

Born on April 16, 1964, in Thane, Vasanti Abhay Gokani is a dynamic educator, artist, and social leader. Academically accomplished, she holds a B.Com from Mumbai University, an MBA from C.V. Raman University, and a specialisation in Early Child Care Education. She also earned a gold medal in Masters in Design from Rachana Sansad and is a graduate in Bharatanatyam and Folk Dance.

Vasanti served 17 years teaching Art and Math at SVPT Saraswati Vidyalaya and spent 15 years as an administrator at SVPM Sanskar Public School, Thane. She bagged the Dadasaheb Phalke Indian Television Award 2025 for her outstanding performance in art and Theatre, and the Lady Singham Bravery Award from Ajay Devgn for saving 15 students. Her artistic talents brought her accolades such as Best Designer, Choreographer, Art Director, and Stage Performer awards. She also received Appreciation from Shri Ram V. Sutar (the designer of Statue of Unity-the highest statue in the world) for pichwai painting.

As a Rotary International Star President (2017–18), she received the Platinum Award and was honoured as a Scout and Guide Master in Delhi. She was also a Goodwill Ambassador at the Global Gujarati Icon Awards in Dubai. Recognised by the then CM of Maharhastra Shri Eknath Shinde and Grandmaster Vishwanathan Anand, she continues to inspire as a panelist and participant in cultural festivals. Vasanti Gokani exemplifies resilience, creativity, and impactful leadership.



Surekha Sadlapur designs happiness!









SUREKHA SADLAPUR

Mrs Surekha Sadlapur, a successful architect and an inspiring interior designer, has been a true inspiration for many women. Since childhood, she was passionate about drawing and even received a Camlin scholarship for her talent, turning her love for art into a career in the year 1995. At that time, women were rarely seen in this field. In fact, she was the sole female student in her architecture class, surrounded by only male peers.

Her journey was not easy; society doubted her, and people often took her lightly just because she was a woman. But with determination and calm attitude, she faced every challenge with strength and grace. Over the past 30 years, she has completed more than 600 projects, proving her excellence and dedication. She has also received an exceptional recognition through a talk in Asia Award.

Mrs Sadlapur believes that success in architecture needs two things - Hard work and Time. Her message to all young female architects is clear - "Keep moving forward no matter what challenges you face. Believe in yourself and stay committed."

Her story is a powerful reminder that women can achieve anything with passion and perseverance.



Dr Kanchan Jaywant goes extra mile beyond dentistry

Dr Kanchan Jaywant, a dentist and devoted social worker, has been transforming lives for over 30 years. Born in Akola, she earned her Bachelor of Dentistry from Government Dental College, Nagpur, and now runs two thriving clinics in Thane—Assured Dental Care and Complete Dental Care.

Her service goes beyond dentistry. Passionate about community welfare, she joined Rotary in 2012-13 and led as President of Rotary Club of Thane Greenspans in 2021-22. Under her leadership, the club saw strong membership growth and impactful projects, including building a school for Adivasi children in Mahuli, Shahpur—an initiative that earned awards and widespread recognition.


She's actively involved in public health advocacy, focusing on de-addiction awareness and Thalassemia education. A longstanding member of the Inner Wheel Club of Thane Midtown, she has championed service for over 20 years.



Dr Kanchan Jaywant

Outside her professional work, Dr Kanchan is a former basketball player and fitness enthusiast, now pursuing Kathak, proving lifelong learning has no age. Married to DGN Dr Nilesh Jaywant, she is a proud mother to Poorva, currently working in the UK.

Dr Kanchan's journey exemplifies passion, perseverance, and purpose—serving others while achieving excellence in every sphere of life.



साधना वझे : समाजसेवेचा वस्तुपाठ

साधना वझे या एक बहुआयामी, समाजाभिमुख आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व आहेत. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ विविध सामाजिक संस्थांतून कार्यरत राहत त्यांनी विशेषतः अंध, कर्णबधिर विद्यार्थी, पर्यावरण आणि विज्ञान प्रचार यासाठी झपाटून कार्य केले आहे. ब्रेल लिपीतून पुस्तकांची उपलब्धता, अंधशाळांमध्ये साहित्य पुरवणे, विज्ञान उपक्रम, कारागृहातील शेती प्रकल्प, पर्यावरण संवर्धन यांसारख्या क्षेत्रांतील त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. समाजहितासाठी झपाटून काम करणाऱ्या साधना वझे यांचे जीवन हे खऱ्या अर्थाने समाजसेवेचे प्रेरणादायी उदाहरण आहे.



त्यांनी M.Sc., B.Lib., DBM ही शैक्षणिक पदवी घेतली आहे. त्यांना वाचन, निसर्गभ्रमंती, रेडिओ ऐकणे, तसेच हिंदी व मराठी गाणी ऐकण्याचा विशेष छंद आहे. गेल्या २० वर्षांहून अधिक काळ इनरव्हीलमध्ये कार्यरत असलेल्या साधना वझे यांनी १९९१-९२, १९९५-९६ आणि २००७-०८ या वर्षांमध्ये अध्यक्षपद भूषवले आहे. रोटरी क्लब ऑफ ठाणे वेस्ट या संस्थेच्या त्या २००२ पासून सदस्य आणि २०१२-१३ मध्ये अध्यक्ष होत्या. कै. शेठ जयंतीलाल त्रिभुवनदास ठाणावाला एज्युकेशन सोसायटी, ठाणे या कर्णबधिर मुलांसाठी कार्य करणाऱ्या संस्थेच्या त्या उपाध्यक्षा आहेत. त्याचबरोबर मराठी विज्ञान परिषद, ठाणे विभाग यामध्ये उपाध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत. स्नेहांकित हेल्पलाईन या संस्थेच्या त्या विश्वस्त म्हणून कार्य करतात.



साधना वझे

'स्पर्श' या चित्रपटातून प्रेरणा घेऊन साधना वझे यांनी दृष्टिहीन समाजासाठी ब्रेल लिपीतून पुस्तके तयार केली. त्यांनी निरंजन उजगरेच्या कविता, नादवेध (अच्युत गोडबोले), विशाखा (कुसुमाग्रज), गीतरामायण (ग.दि. माडगुळकर), महाराष्ट्र दर्शन (गो. नी. दांडेकर), एल्गार (सुरेश भट), नटसम्राट (वि. वा. शिरवाडकर), चॅम्पियन्स (द्वारकानाथ संझागिरी), भंगार (अशोक जाधव), किमयागार (अच्युत गोडबोले) अशी अनेक पुस्तकं ब्रेल लिपीत उपलब्ध करून दिली. 'किमयागार' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी अच्युत गोडबोले आणि पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांची उपस्थिती होती. रोटरी इंडिया लिटरसी मिशन अंतर्गत 'हॅपी स्कूल' प्रकल्पात भारतातील सुमारे ४०० अंधशाळांमध्ये हिंदी-मराठी भाषेतील २०-२० पुस्तकं ब्रेलमध्ये उपलब्ध करून देण्याची योजना त्यांनी यशस्वीरित्या राबवली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे ७५ लोकांना नवनाथ कथासागर ब्रेल लिपीत उपलब्ध झाले. "व्हर्च्युअल आय" या नवीन प्रयोगालाही त्यांनी मार्गदर्शन व सहकार्य दिले.

इनरव्हील, रोटरी व मराठी विज्ञान परिषद या माध्यमांतून त्यांनी बोटॅनिकल गार्डनचा शालेय विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरावर उपक्रम, तसेच "वाळ्याची शेती" हा अनोखा उपक्रम ठाणे कारागृहात राबवला. २००४ पासून चालू असलेला "विज्ञान जागृती उपक्रम" आजही शहरी व ग्रामीण भागात दरवर्षी मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या सुरू आहे. मराठी विज्ञान परिषद, चुनाभट्टी मार्फत दृष्टीहीन व कर्णबधिर मुलांसाठी अनेक विज्ञान कार्यक्रम राबवले जातात. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील "अर्जुन" नावाच्या बिबट्याचे गेली ९ वर्षे त्यांनी पालकत्व स्वीकारले आहे, तसेच पाणवठा फाउंडेशनमार्फत एक गाय दत्तक घेतली आहे. पर्यावरणाच्या जतनाबाबतही त्यांची संवेदनशीलता जाणवते. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. त्यामध्ये इनरव्हील डिस्ट्रीक्ट ३१४ तर्फे कमलादेवी गुप्ता सर्व्हिस ट्रॉफी, रोटरी क्लब ठाणे वेस्ट, ब्लाईंड पर्सन्स असोसिएशन, नॅशनल फेडरेशन ऑफ ब्लाइंड यांच्याकडून सत्कार, २०१० मध्ये हरिद्वारमधील गायत्री ज्ञान प्रचार केंद्राकडून आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त प्रसिद्ध वकील आभा सिंग यांच्या हस्ते सत्कार, २०१४ ला ठाणे महानगरपालिकेचा "ठाणे गौरव" पुरस्कार पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते, २०२२ मध्ये दुर्गाशक्ती अवॉर्ड (रोटरी प्रिमियम) आणि २०२३ मध्ये Vocational Excellence Award (रोटरी क्लब ठाणे वेस्ट) या पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. त्यांचे "ताडोबातील वाघोबा" आणि "कान्हाचा कोंडा" हे लेख वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले आहेत. तसेच "ब्रेल – एक वरदान" हा लेख मराठी विज्ञान परिषदेच्या पत्रिकेत प्रसिद्ध झाला असून याच विषयावर आकाशवाणीवर भाषण प्रसारित झाले आहे.

साधना वझे यांचे जीवन म्हणजे समाजसेवेचा वस्तुपाठ आहे. अंध, कर्णबधिर, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व वैज्ञानिक प्रबोधन, पर्यावरण संरक्षण तसेच विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी समाजात उल्लेखनीय ठसा उमटवलेला आहे. त्यांच्या कार्याला सलाम!

प्रशिक्षणातून सामाजिक सशक्तीकरण

प्रत्येकामध्ये काही ना काही कला दडलेली असते. काहीजण त्याचा छंद म्हणून उपयोग करतात तर काही त्याकडे करिअर म्हणून पाहतात. वेळ वाया घालवणे हा गुन्हा आहे या पालकांच्या तत्वानुसार लहानपणापासूनच इकेबाना जपानी फुलांच्या सजावटीचे प्रशिक्षण घेऊन पुढे फुलं व लँडस्केप डिझायनर म्हणून त्यांनी १७ वर्षं काम केले.

मनीषा कोंडसकर यांचा जन्म एका शिस्तप्रिय मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. दोघेही पालक नोकरीत असल्यामुळे वेळेचं नियोजन, सातत्य आणि कार्यक्षमतेचे मूल्य त्यांच्यात लहानपणापासूनच रुजले. "वेळ वाया घालवणं म्हणजे गुन्हा" हे पालकांचं तत्त्वज्ञान त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पाया ठरलं.

लहानपणापासूनच मनीषा यांना सर्जनशीलतेची ओढ होती. शाळा-कॉलेजमध्ये त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये आपली चमक दाखवली. नॅशनल कॅडेट कोअर (NCC) मध्ये त्यांनी कठोर प्रशिक्षण घेतलं आणि मेजर दडकर पुरस्कार मिळवला. यातून त्यांच्यात नेतृत्वगुण, जिद्द आणि धोरणात्मक विचारसरणी विकसित झाली. वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षी त्यांनी इकेबाना जपानी फुलांच्या सजावटीचं शिक्षण घेतले. १८ व्या वर्षी त्यांनी ओहारा स्कूल, जपान येथून "इन्स्ट्रक्टर लेव्हल" पूर्ण केली. त्यांनी अनेक फुलांच्या सजावटीच्या स्पर्धांमध्ये पुरस्कार मिळवत आपलं नाव कमावलं. याच कौशल्याच्या जोरावर बिर्ला ग्रुपमध्ये फुलं व लँडस्केप डिझायनर म्हणून त्यांनी १७ वर्षे काम केले. त्यांच्या डिझाईनच्या कौशल्यामुळे थायलंडमध्ये प्रशिक्षणासाठी त्यांना पाठवण्यात आलं.





मनीषा कोंडसकर

कलासक्त आणि उद्योजकीय वृत्तीमुळे त्यांनी IHMCTAN, दादर येथून बेकिंग व कन्फेक्शनरी डिप्लोमा पूर्ण करून "याहांका" नावाने स्वतःचा बेकरी व्यवसाय सुरू केला. कॉर्पोरेट ग्राहकांना सेवा देत त्यांनी 'बेस्ट एंटरप्रेन्युअरशिप अवॉर्ड' मिळवला. इकेबाना क्षेत्रात ३५ वर्षांचा अनुभव असलेल्या मनीषा कोंडसकर यांनी ५ हजारहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले आहे. त्यांचे बरेच विद्यार्थी ओहारा स्कूल, जपानमधून मान्यताप्राप्त डिप्लोमा मिळवून आज यशस्वी कारकीर्द घडवत आहेत. १९९३ मध्ये त्या रोटरी इंटरनॅशनलमध्ये सहभागी झाल्या. क्लबच्या चार्टर प्रेसिडेंट म्हणून २२ महिन्यांचा कार्यकाळ त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केला. त्यांनी Interact व Rotaract क्लब्स स्थापन केले आणि पायगाव येथे कम्युनिटी सेंटर उभारले. महिलांसाठी शिवणकला प्रशिक्षण, वाचनालय, खेळणी दालन आणि वैद्यकीय तपासणी केंद्र सुरू केलं. रोटरी उपक्रमांद्वारे त्यांनी हजारो युवकांना RYLA, MUNA, आणि "More Women in Rotary" सारख्या कार्यक्रमांतून मार्गदर्शन केलं. त्यांच्या कामगिरीसाठी त्यांना रोटरी डिस्ट्रिक्ट सर्व्हिस पुरस्कार, अव्हेन्यू ऑफ सर्व्हिस पुरस्कार यांसारखे सन्मान मिळाले.

पर्यावरण संवर्धन क्षेत्रात त्यांनी ठाणे महापालिकेच्या ट्री अथॉरिटीमध्ये काम करत ८.३५ लाख झाडांची लागवड केली. शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती आणि महिलांना ग्रामीण उद्योग प्रशिक्षण दिले. 'ठाणे गौरव पुरस्कार' त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मिळाला. इम्पॅक्ट अॅकॅडमीच्या माध्यमातून त्यांनी फ्लॉवर डेकोरेशन, इव्हेंट मॅनेजमेंट, बेकिंग, हस्तकला यामध्ये प्रशिक्षण देऊन महिलांना आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग दिला. स्व. धर्मवीर आनंद दिघे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सामाजिक उपक्रम त्यांनी आत्तापर्यंत राबवले. त्यांच्या पाठीशी पती अजित कोंडसकर यांचं भक्कम पाठबळ आहे. मुलगा यु.के.मध्ये हॉटेल मॅनेजमेंट शिकला असून, मुलगी आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन क्षेत्रात यशस्वी आहे. कौटुंबिक आणि व्यावसायिक आयुष्यात त्यांनी सुंदर समतोल राखला आहे.

मनीषा कोंडसकर यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडून आलं आहे. त्या खऱ्या अर्थानं एक प्रेरणादायी आणि परिवर्तनकारी व्यक्तिमत्त्व आहेत.

पान १ वरून

आंतरराष्ट्रीय स्तरावर मधुरीकाने ठाण्याचे नाव उंचावले



मधुरिका यांच्या मते, टेबल टेनिससारख्या वेगवान खेळात मानसिक ताकद ही शारीरिक क्षमतेइतकीच कदाचित त्याहून अधिक महत्त्वाची असते. झपाट्याने निर्णय घेणं, प्रत्येक गुणासाठी मनःस्थिती ठेऊन खेळणं, ही सगळी मानसिक तयारीच असते. स्पर्धेपूर्वी त्या केवळ शारीरिक सराव करत नाहीत, तर डाएट, विश्रांती, मानसिक स्थैर्य यावरही भर देतात. खेळाचे जुने व्हिडिओ बघून रणनीती आखणं हे त्यांच्या तयारीचा एक महत्त्वाचा भाग असतो.

२०१८ च्या कॉमनवेल्थ गेम्समधील त्यांचा सुवर्णपदकाचा सामना हा त्यांच्या आयुष्यातला अविस्मरणीय क्षण आहे. त्या दिवशी त्यांनी केवळ भारतासाठी विजय मिळवला नाही, तर स्वतःच्या क्षमतेवरही शिक्कामोर्तब केलं. यशाच्या प्रवासामध्ये त्यांना नेहमीच त्यांच्या कुटुंबियांकडून प्रेरणा मिळाली. त्यांची साथ, विश्वास आणि समजूतदारपणामुळेच त्या प्रत्येक संकटावर मात करू शकल्या. इतर महिला खेळाडूंच्या संघर्षातूनही त्यांना मोठी प्रेरणा मिळते.

मधुरिका यांच्या खेळामुळे समाजातही सकारात्मक बदल घडले. त्यांच्या यशामुळे अनेक शाळांमध्ये टेबल टेनिसला चालना मिळाली आणि अनेक मुलींनी प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली. मधुरिका या देखील भविष्यात प्रशिक्षक होण्याचा विचार करत आहेत, कारण त्यांना त्यांच्या अनुभवातून इतरांना मार्गदर्शन करायचं आहे. त्यांना वाटतं की ग्रामीण भागात टेबल टेनिस हा खेळ पोहोचवणं, महिला खेळाडूंना मानसिक प्रशिक्षक देणं आणि अधिक स्पर्धा आयोजित करणं हे या क्षेत्रातले महत्त्वाचे बदल असू शकतात.

विजय आणि पराभव या दोन्ही गोष्टी त्या समजून घेतात. जिंकल्यावर नम्र राहणं आणि हरल्यावर त्यातून शिकणं हेच त्यांच्या यशाचं सूत्र आहे. प्रत्येक सामना हा एक शिकवण देतो, असं त्या मानतात आणि म्हणून त्या कधीच थांबत नाहीत. पुढच्या सामन्याची तयारी सतत सुरू असते.

मधुरिका पाटकर यांची ही कहाणी केवळ टेबल टेनिसपुरती मर्यादित नाही, तर कोणत्याही क्षेत्रात आपल्या ध्येयासाठी झगडणाऱ्या प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरते. मेहनत, चिकाटी आणि समर्पण या त्रिसूत्रीवर उभा राहिलेला त्यांचा प्रवास अनेक तरुणांसाठी दीपस्तंभ ठरेल, यात शंका नाही.



साल्सा : नृत्यातून आनंद आणि आत्मविश्वास मिळवणारी कला

नृत्यकला ही भारतीय संस्कृतीतील ६४ कलांपैकी एक मानली जाते. मानवी भावभावनांशी नाते जोडणारी ही कला आता फक्त परंपरेपुरती मर्यादित न राहता, आधुनिक जीवनशैलीचा भाग बनली आहे. आज अनेक तरुण-तरुणी नृत्य क्षेत्रात पूर्णवेळ करिअर करण्याच्या दृष्टीने धाडसी पावले उचलत आहेत.

पाश्चिमात्य देशांतून भारतात आलेल्या अनेक नृत्यप्रकारांमध्ये साल्सा या क्युबन नृत्यशैलीला विशेष लोकप्रियता मिळाली आहे. विशेषतः मुंबई आणि ठाणे परिसरात या नृत्यप्रकाराने तरुणाईला भुरळ घातली आहे. या नृत्यप्रकाराचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन त्याचा प्रसार करण्याचे काम ठाण्यातील ऐश्वर्या कृष्णन करत आहे. अवघ्या १५ व्या वर्षी साल्साचे प्रशिक्षण सुरू करणाऱ्या ऐश्वर्याने, वयाच्या १९ व्या वर्षीच साल्सा शिकवण्यास आरंभ केला. आज तिचे क्लासेस ठाण्यातील मानपाडा व हिरानंदानी इस्टेट, पवई आणि मुलुंड या ठिकाणी नियमितपणे चालतात. दोन महिन्यांच्या कालावधीत ती साल्साचे बेसिक प्रशिक्षण देते. तिने बचाटा सेन्शुअलचे प्रमाणपत्र मिळवले असून, तिला "वाव पुरस्कारा"ने गौरवण्यात आले आहे. आजवर अनेक सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स आणि बॉलिवूडमधील कलाकारांनाही तिने ऑनलाईन स्वरूपात साल्सा शिकवले आहे. विशेष म्हणजे, गर्भवती असतानाही तिने न थांबता नृत्य शिकवले. नायकी या आंतरराष्ट्रीय ब्रँडच्या मॅगझिनमध्ये "मोस्ट पॉवरफुल वूमन" म्हणून तिचे फोटोशूटही झाले आहे.

केवळ नृत्य शिकवणेच नव्हे तर ऐश्वर्या विविध कॉर्पोरेट इव्हेंट्ससाठी साल्सा वर्कशॉप्सही घेते. तिने विविध देशांमध्ये जाऊन नामांकित साल्सा फेस्टिव्हल्समध्ये सहभाग घेतला आहे. दर महिन्याच्या शेवटच्या सोमवारी ती "मंडे लॅटिन फिव्हर" नावाचा कार्यक्रम ठाण्यातील MH 04 Drunkyard या ठिकाणी आयोजित करते, ज्यामुळे साल्साची झिंग स्थानिक पातळीवरही वाढली आहे. साल्सा शिकण्यासाठी कोणत्याही वयोमर्यादेची आवश्यकता नाही. ऐश्वर्याच्या क्लासमध्ये १० ते ६५ वयोगटातील विद्यार्थी उत्साहाने सहभागी होतात. या नृत्यामुळे केवळ शारीरिक आरोग्य सुधारत नाही, तर मानसिक तणावही कमी होतो. नृत्य केल्यामुळे मन आनंदी राहते, वजन नियंत्रणात राहते आणि आत्मविश्वासातही वाढ होते.



ऐश्वर्या क्रिष्णन

ऐश्वर्याच्या मते, तिच्या क्लासमध्ये शिकणारे विद्यार्थी हे एकमेकांसाठी एक कुटुंब बनले आहेत. आजच्या धकाधकीच्या जीवनात, थोडा वेळ स्वतःसाठी देत काही आनंदाचे क्षण अनुभवण्याची ही एक सुंदर संधी आहे. म्हणूनच "साल्सा नृत्य हे प्रत्येकाने अनुभवायला हवे", यासाठी ती आवाहन करते.

Educator, Author, Social Worker: Radhika Gupte dons several hats









Radhika Gupte

Radhika Gupte, deeply rooted in Dombivli, has dedicated her life to social betterment, education, and empowerment. Daughter of Late Dattatray Ketkar, a witness to Dombivli's transformation, she actively champions local development in education, sports, and welfare. A committed member of the Indian National Congress, she served as Vice-President of the Kalyan City District Women's Congress (2011) and President of the Handicapped Cell, Maharashtra Pradesh Congress Committee. She led the "Mahila Jodo" movement, encouraging women to join the INC and organized medical camps for the underprivileged.

A graduate in Arts from Mumbai University, she also holds a diploma in Special Education. Radhika began as a special educator at Astitva School (1984–88), later serving as its Principal until 2012. Currently, as President and Administrative Trustee of the Astitva Institute, she envisions a multi-storeyed hub for the specially abled, with integrated schools, workshops, therapy centres, business stalls, and residential facilities.



A Rotarian since 1997 and Club President in 2005–06, she has led initiatives in polio and illiteracy eradication, serving the Rotary India Literacy Mission. Honoured with numerous awards, including a National Award (2010–11), she is also the author of two books on mental health. A teacher, author, activist, and leader—Radhika Gupte is truly a woman of substance.

औषधशास्त्र क्षेत्रातील एक दूरदृष्टी - वैशाली नायर



वैशाली नायर

लहान वयातच विज्ञान आणि गणिताची गोडी असलेल्या तसेच वैद्यकीय किंवा फार्मसी क्षेत्रात करिअर करायचे असे स्वप्न उराशी बाळगलेल्या वैशाली नायर यांनी औषधशास्त्रात फार्मसीमध्ये पदवी मिळवली. विज्ञान क्षेत्रात अधिकाधिक संशोधन करण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

१९९३ साली जेव्हा त्यांनी आपल्या करिअरची सुरुवात केली, तेव्हा हे क्षेत्र प्रामुख्याने पुरुषांचे होते. मात्र वैशालीताई कधीच मेहनतीला घाबरल्या नाही. अनेक अडचणींना सामोरे जात त्यांनी आपले स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. जास्त वेळ काम करणे, विभागांची उभारणी करणे अशा जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. तंत्रज्ञान क्षेत्रातील अतिरिक्त प्रमाणपत्रांमुळे त्यांनी आपले ज्ञान बळकट केले आणि व्यावसायिक नातेसंबंध प्रस्थापित करून आपली प्रगती साधली.

करिअर आणि कुटुंब यांचा समतोल राखताना अनेकदा त्यांना तारेवरची कसरत करावी लागली, पण त्यांचा विश्वास आहे की योग्य सीमारेषा आखल्या तर कोणतेही काम शक्य आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक नव्या शोधांना दिशा मिळाली आणि त्यांना बेस्ट व्हिजनरी लीडर यांसारखे पुरस्कारही मिळाले.

"आपल्या अंतःप्रेरणेचा पाठपुरावा करा आणि तुमची जिज्ञासा हीच तुमची दिशा ठरवा", असा सल्ला त्यांनी विज्ञान क्षेत्रातील तरुण महिलांना दिला आहे.



पान १ वरून

श्रद्धा नाईक : बॉलीवूडच्या सौंदर्यविश्वामागची जादूगार



बारावीची परीक्षा देत असतानाच तिच्या आईने एक छोटेखानी ब्युटी पार्लर सुरू केले. घरातील या व्यवसायात हातभार लावण्यासाठी श्रद्धाने एक छोटासा ब्युटी पार्लर कोर्स केला आणि आईच्या मदतीसाठी पुढे सरसावली. हळूहळू तिने ब्रायडल मेकअपच्या ऑर्डर्स घ्यायला सुरुवात केली आणि त्याचवेळी तिला या क्षेत्रातच आपले करिअर घडवायचे आहे, हे जाणवले. श्रद्धाने आपल्या कौशल्याला आकार देण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. सर्वप्रथम तिने Electra Academy मधून प्राथमिक प्रशिक्षण घेतले आणि त्यानंतर लंडनमध्ये जाऊन अॅडव्हान्स मेकअप कोर्स पूर्ण केला. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शिक्षणामुळे तिच्या कलागुणात अमूल्य भर पडली आणि तिचा आत्मविश्वासही प्रचंड वाढला. या सशक्त प्रशिक्षणाच्या बळावर तिने सौंदर्यकलेचा नवीन अध्याय सुरू केला.

श्रद्धाचा सुरुवातीचा टप्पा तितकाच संघर्षमय होता. तिने सुरुवात असिस्टंट हेअर ड्रेसर म्हणून दोन मराठी चित्रपटांतून केली. ही छोटी सुरुवात तिच्या भावी यशाचा पाया ठरली. काही काळातच श्रद्धाने बॉलिवूडकडे आपले लक्ष केंद्रित केले आणि तिथेही आपल्या उत्कृष्ट कामगिरीने स्थान निर्माण केले. श्रद्धा कपूर, यामी गौतम, कृति सेनन यांसारख्या अभिनेत्रींसोबत काम करताना तिने आपल्या मेकअप कौशल्याने त्या प्रत्येकाच्या सौंदर्याला नवा आयाम दिला. रेड कार्पेट असो, फोटोशूट असो किंवा सिनेमातील विशेष दृश्य श्रद्धाचा मेकअप नेहमी लक्षवेधी ठरतो. आज श्रद्धाच्या नावाशी अनेक दिग्गज अभिनेत्रींचा मेकअप जोडला गेलेला आहे. अनन्या पांडे, सुहाना खान, शनाया कपूर, दीपिका पदुकोण आणि कॅटरिना कैफ यांसारख्या नव्या आणि लोकप्रिय अभिनेत्रींना तिने सजवले आहे. या सगळ्यामध्ये तिच्या कामातील ,बारकावे जाणवतात. चेहऱ्याच्या वैशिष्ट्यांनुसार मेकअपची शैली ठरवणे, स्किनटोन आणि प्रकाशाचा विचार करून योग्य रंगांची निवड करणे आणि एकूणच अभिनेत्रीच्या व्यक्तिमत्त्वाला पूरक लूक तयार करणे, ही श्रद्धाची खासियत आहे.

श्रद्धा एक यशस्वी उद्योजिका आणि प्रशिक्षिका सुद्धा आहे. तिने Magic Salon नावाचे एक सौंदर्यसंकल्पना केंद्र मुंबईत सुरू केले असून, त्या माध्यमातून अनेक तरुणींना मेकअपच्या क्षेत्राबाबत प्रशिक्षण देते. तिच्या मार्गदर्शनाखाली घडणाऱ्या नवोदित मेकअप आर्टिस्ट्ससाठी श्रद्धा एक आदर्श व्यक्तिमत्व ठरली आहे. आपल्या आईकडून प्रेरणा घेऊन आणि तिच्याच पाठिंब्यावर श्रद्धाने हे यश मिळवले आहे, हे ती अभिमानाने सांगते. सौंदर्याला आत्मविश्वासाचं रूप देणारी ही गुणी मेकअप आर्टिस्ट भविष्यात अजून कोणकोणत्या उंचीवर पोहोचेल, याकडे संपूर्ण इंडस्ट्री आणि तिचे चाहते उत्सुकतेने पाहत आहेत.

From Pg 1

CA Pradhan handling CSR of Reliance Foundation

Sangeeta has worked in different industries and has experience in handling taxes, contracts and accounting. She says that with good knowledge and the help of new technology, the CA profession has become easier and more efficient. But one should also be careful about things like social security. She believes that every woman has equal opportunity. With hard work and focus, anything is possible.



For exam preparation, she suggests starting early, planning your time well, and using only 80% of your available days for studying. Begin with easy topics to build confidence, and slowly increase your study time. Solve past exams papers with a timer to get used to the real exam.

Sangeeta Pradhan's story heralds that with belief and efforts, success is possible.

शिस्तप्रिय कार्यक्रम आयोजनकर्त्या सुचेता कलोती











सुचेता कलोती



प्रेक्षक ते प्रेषक असा प्रवास करणाऱ्या ठाण्यातील आघाडीच्या संगीत कार्यक्रम तसेच संगीत शृंखला आयोजिका सुचेता कलोती यांनी शिक्षण एका वेगळ्या शाखेत घेऊन भविष्यात करिअर मात्र वेगळ्याच क्षेत्रात घडवले. अशी अनेक उदाहरणे आपल्याला माहिती असतील. अशांमध्ये आणखी एका नावाची भर पडते, ते नाव म्हणजे ठाण्यातील शिवरंजनी संस्थेचा प्रमुख घटक असलेल्या सुचेता कलोती.

सुचेता कलोती यांचे शिक्षण मानसशास्त्रातील असले, तरी त्या एक उत्तम इव्हेंट प्लॅनर आहेत आणि सातत्याने विविध लोकांच्या संपर्कात राहण्याच्या त्यांच्या गुणामुळे आणि रसिकांचे मानसशास्त्र त्यांना उत्तम माहिती असल्यामुळे सध्या त्या आघाडीचे सांगितिक कार्यक्रम आयोजित करतात आणि ते उत्तमरित्या यशस्वीही करून दाखवतात. अर्थातच याची झलक ठाणेकरांनी शिवरंजनीच्या विविध कार्यक्रमातून पाहिलेली आहे.

मध्यप्रदेश येथील छिन्दवाड़ा येथे उच्चशिक्षित घरात जन्मलेल्या सुचेता यांच्या कुटुंबात सगळेच कायदेतज्ज्ञ म्हणून सुपरिचित आहेत, कदाचित म्हणूनच शिस्त आणि सुसूत्रता हा त्यांच्या आयुष्याचाच अविभाज्य भाग आहे, जो त्यांनी हाती घेतलेल्या इव्हेंटमध्येही दिसतो.

सुचेता यांचे कला क्षेत्रात पदार्पण झाले तेच मुळी त्यांच्या आईला असलेल्या संगीताच्या आवडीतून! मानसशास्त्राच्या पदवी सोबतच, आईवरच्या नितांत प्रेम आणि हट्टापायी त्यांनी शास्त्रीय संगीताचे प्रारंभिक शिक्षण देखील घेतले. १९९९ मध्ये लग्न होऊन शिवाजी पार्क, दादर येथे त्या स्थायिक झाल्या. त्यांचा संगीत व्यासंग वाढला, जाहिरात क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक गुणी कलाकारांच्या नवीन ओळखी झाल्या. त्यातून जन्माला आली त्यांची स्वतःची उद्योजिका म्हणून स्वतंत्र ओळख! अगदी भेटवस्तू डिझायनिंग ते लग्न सोहळ्याच्या इव्हेंट प्लॅनिंग पर्यंत अनेक गोष्टी त्यांनी अतिशय यशस्वीपणे पार पाडल्या. त्याच दरम्यान गुणीदास संगीत संमेलन, काला घोडा महोत्सव, पंडीत भीमसेन जोशी, उस्ताद झाकीर हुसेन, पंडीत जसराज, जगजीत सिंग अशा अनेक प्रतिष्ठित कला महोत्सव आणि दिग्गज कलाकारांचे कार्यक्रम नियमितपणे संपूर्ण कुटुंबासमवेत जवळून अनुभवता आले.

स्वतः एक प्रेक्षक असल्यामुळे प्रेक्षकांना काय आवडतं, याचं ज्ञानही त्यांना उत्तम होतं. छिन्दवाड्याची शिस्त, नागपूरचे आदरातिथ्य आणि मुंबईतील त्यांचा मोठा जनसंपर्क याच्या उत्तम संगमातून मग सुरुवात झाली ती संगीत कार्यक्रमाच्या आयोजनाची! मागील १५ वर्ष सुचेता कलोती ठाण्यात वास्तव्याला आहेत, या काळात मागील ११ वर्षे त्या ठाण्यातील संस्कृती कला महोत्सवाला जोडल्या गेल्या आहेत. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनात त्यांचा मोठा वाटा आहे. चार दिवस चालणाऱ्या या कला महोत्सवास दरवर्षी लाखो लोक भेट देतात, यात सादर होणारे सर्व शास्त्रीय, उपशास्त्रीय कलाप्रकार आणि कलाकारांची निवड आणि नियोजन यात त्या जातीने लक्ष घालतात.

संगीतकार स्व.प्रकाश नवले यांनी कलेच्या प्रचार आणि प्रसारासाठी निर्मिती केलेल्या 'शिवरंजनी' संस्थेचा कारभार त्या मागील १० वर्षे अगदी नेटाने पुढे नेत आहेत. पद्मविभूषण पं. हरिप्रसाद चौरसिया, पद्मश्री प्रल्हादसिंग टिपानिया, पद्मश्री शुभा मुदगल, पद्मश्री शाहिद परवेझ, उस्ताद तौफिक कुरेशी, विदुशी कलापिनी कोमकली, उस्ताद बाबू खान, पं.रवी चारी, पं.विवेक सोनार यासारख्या अनेक दिग्गज आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कलाकारांचे भव्य आणि देखणे कार्यक्रम आजवर सुचेताजींनी शिवरंजनीच्या माध्यमातून ठाण्यात आयोजित केले आहेत.

ठाण्याच्या कला आणि सांस्कृतिक चळवळीमध्ये त्यांचे खूप मोठे योगदान आहे.

बहुगुणी कलाकार : शिरीन तुलालवार

एक कुशल समुपदेशक, समाजशास्त्रज्ञ आणि बहुगुणी कलाकार म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या शिरीन तुलालवार यांनी समाजसेवा आणि मनोरंजन या दोन्ही क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (TISS) या नामांकित संस्थेतून त्यांनी समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले असून, अनेक वर्षे त्यांनी वैयक्तिक आणि कौटुंबिक समस्यांवर मार्गदर्शन करून अनेकांचे आयुष्य उजळवले आहे.



शिरीन तुलालवार

समुपदेशक म्हणून रुग्णालये, उद्योग आणि शैक्षणिक संस्थांपर्यंत शिरीन तुलालवार यांचा अनुभव विस्तारलेला आहे. विशेषतः कौटुंबिक न्यायालयात त्यांनी विवाह समुपदेशक म्हणून सलग २४ वर्षे सेवा दिली. २०१८ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली. विवाह समुपदेशनातील त्यांच्या सखोल ज्ञानाचा उपयोग त्यांनी Journal of Marriage Counseling या विवाह समुपदेशक संघटनेच्या जर्नलसाठी संशोधनात्मक लेख लिहून केला. ज्यातून विवाह जीवनातील नाजूक विषयांवर प्रकाश टाकण्यात आला. शिरीन यांनी विवाहपूर्व समुपदेशन, वैवाहिक नातेसंबंध व्यवस्थापन आणि वैवाहिक वादांचा मुलांवर होणारा परिणाम यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर असंख्य कार्यशाळा घेतल्या आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा अनेक दाम्पत्यांना व कुटुंबांना झाला असून समाजाच्या आरोग्यदृष्टीनेही त्याचे मोठे महत्त्व आहे.

खाजगी आयुष्यात शिरीन दोन मुलांच्या आई आहेत. कुटुंब आणि करिअर यांच्यात त्यांनी नेहमीच उत्तम समतोल साधला आहे. समुपदेशन, समाजसेवा आणि कला या तीनही क्षेत्रात शिरीन राजीव तुलालवार यांचे योगदान प्रेरणादायी असून, त्या अनेक महिलांसाठी आणि समाजासाठी एक आदर्श आहेत.

समुपदेशनाबरोबरच शिरीन यांची रंगभूमी आणि मराठी मनोरंजन सृष्टीतील वाटचालही तितकीच उल्लेखनीय आहे. गेल्या ४० वर्षांपासून त्या मराठी रंगभूमीशी आणि टेलिव्हिजन क्षेत्राशी जोडल्या आहेत. चारचौघी, या सुखांनो या, ऊन पाऊस आणि डॉ. डॉन या मालिकांमधील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या विशेष लक्षात राहिल्या आहेत. मराठी चित्रपटसृष्टीतही त्यांचा ठसा आहे. अगं बाई अरेच्चा, पोस्टर बॉईज, रूपनगर के चीते, प्रेम पहिलं वहिलं, आपली माणसं आणि अलीकडील ब्लॉकबस्टर वेड या रितेश देशमुख दिग्दर्शित चित्रपटातही त्यांनी दमदार भूमिका साकारल्या आहेत. याशिवाय त्या एक कुशल निवेदिका आणि व्हॉईसओव्हर आर्टिस्टही आहेत. विविध कार्यक्रमात त्यांनी निवेदन केलं असून, त्यांच्या आवाजाची ताकद आणि मंचावरील प्रभावी उपस्थिती यामुळे त्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतात.





